# गावमातीचा संस्कार जपणाऱ्या गावगाड्यातील माणसाची कविता 'पाढा'

**प्रा. डॉ. पंडीत गंगाधरराव रानमाळ**
मराठी विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना

पाढा या संग्रहातून गाव-गावपण व्यक्त करणाऱ्या कविता भरून येणारे मन, काळजातून उगवलेल्या वाटा, पावसाचं रांगण या म्हणता येईल. परंपरेशी एकनिष्ठ माणसे असतात. त्यांचे त्यांचे काही संस्कार असतात त्या काळजातून उनवलेल्या वाटा असतात. गावमातीचा संस्कार कविमानावर खोलवर ओल प्रकट करणारा आहे. हा संस्कार वैभवसंपन्न उदार असा आहे.खळं सुरु असताना बैल हागले तर तळहातावर झेलने, झाडाला आलेली फुल-फळ यांना थेट बोट न दाखवणे, प्रामाणिकपणासाठी मारो तीचा शेंदूर काढणे, ज्वारी हातात धरणे हेच खरे-खोटेपणाचे न्यायालय गावपांढरीत असते. शेतातील पहिले पीक म्हणजे लक्ष्मी येते हा संकेत. शेणामातीने घर सारवने, आलेल्या पाहुण्यांना तांब्याभर पाणी देणे-गुळखडा देणे, समोरून भरलेली घागर घेऊन जाणारी स्त्री पहिली की खिशातून पैसे टाकणे, गावात कोणी मेले की तर भावभावकीत चूल न पेटणे, इतरांनी भाकरी -भाजी नेऊन कडुघास काढणे, एखाद्याची शेतपेरणी राहिल्यास त्यांची पेरणी करून देणे असा जिव्हाळा संस्कार गावात असतो हे कवी गावातील परंपरा, संस्कार काळजातून उगवलेल्या वाटा ह्या कवितेतून व्यक्त करतो. पाऊस पडला नाहीतर गावातील माणसे देहभान विसरतात. अश्या खेड्यातील माणसाविषयी आतुरता कवी व्यक्त करतो गाव सोडताना आई- वडील, भाव-भावकीबद्दल ढग भरून यावेत तसे कवीचे मन भरून येते,हा कवी गाव, खेडे, तेथील माणसे, शेती-भाती, परिस्थिती याचे वर्णन वास्तवदर्शी व्यक्त करतो. मराठी कवितेत अनुभवले पण क्वचितच पाहायला मिळते.

'पाढा ' या कवितांमधील कविच्या मनात घर करून असलेला एक हळवा कोपरा म्हणजे, कवीचे शेतकरी बाप-आई हे होय. त्यांच्यासंबधीच्या भावना बादशहा,सवाल, प्रार्थनेची कोवळी पाने, झाड, श्वास या कविनेतून व्यक्त होते. बादशाह या कवितेत शेतकरी दुःखमय वेदना घेऊन जगतो तरीही तो हतबल होत नाही.त्या 'बापाचे' हृदयभेदी  शब्दचित्र कवी उभा करतो.शेतकरी हा सर्वजनाचा बादशाह जमीनीशी अपरंपार नात असलेला, पीक, पक्षी, शेतजमीन यातच आपले मोहरणं शोधणारा, वाझं ढंग पाहताना मरण प्राय यातना सोसणारा  शेतकरी-बाप कवितेत उभा राहतो.

'बापाच दु:ख जमिनीसारखं

काळभोर

बापाच सुख

ओठ्यातून खळखळ वाहणाऱ्या पाण्यासारखं

राबण्याचे श्रमसिद्धांत

 त्यानं हजारवेळा मांडलेले

नांगराच्या फाळाचे

धारदार गणित

त्याच्या मेंदूत रुतून बसलेले"

अशा शेतकरी बापाच्या  वेदना कवी व्यक्त करतो. शेतकरी बाप एक 'झाड' जे दुसऱ्याला सावली देते. स्वतः मात्र उन्हातान्हात दु:ख झेलते. एक वेगळी प्रतिमा 'झाड' यातून कवी 'बाप'उभा करतात.

झाड -आनंद जपणे

झाड - पावसात भिजते

उन्हात कोलमडते

दुष्काळात-दुःख झेलते

झाड -इमान

झाड - दुःख दाबून ठेवते.

"आशीवादाचे सर्व

आलेख झाडांच्या पोटी जन्म घेतात

पावसाळा असो नसो

झाडं

अखंड

हिरव्या

सुखात

नादतात "

कवी केशव देशमुख यांनी या रूपकातून 'झाड' या रुपकातून बाप ही व्यक्तीरेखा मार्मिकपणे व्यक्त केली मराठी ग्रामीण कवितेत-बापाचे हे चित्र मोजक्या कवितेत व्यक्त झालेले आहे शेतकरी बापाची पंढरी ही त्याची 'पांढरी'ची जमीन आहे. जेवढा पंढरपूरच्या पांडुरंग हा त्याचा श्वास आहे तसाच पांढरीची जमीन ही त्याचा श्वास आहे. अश्याप्रकारे बापाचे मार्मिकपणे वर्णन कवितेत येते.

'कणा', मोतीबिंदू' यातून आईचे वर्णन कवी करतो. घरातील कोणत्याही प्रकारची भिती-घालवण्याचे काम आई करते. आई हे सावलीच रूप आहे. स्वतःचे दुःख सोसत पाठीचा कणा ताठ ठेवत जगत असते आई. आईला मोतीबिंदू झाल्यावर ऑपरेशन झाल्यानंतर घरातील अस्तित्व श्रीमंती कविला देऊन गेले.

'कॉलेजला निघालो म्हणजे

तिचे सायीचे हात

मला श्रीमंती देत

नंतर ती खोलीत एकटी राही'

अश्या प्रेमळ स्वभावाची, कष्टकरी आईचे रूप कवी व्यक्त करतो.

या संग्रहातील एक वेगळी कविता म्हणजे 'बैल' ही होय. ही कविता या संग्रहातील सूक्त आहे शेतक-याच्या मुखातून बैलासंबंधी 'माझा बैल' हा शब्द सर्वहारा असाच आहे. बैलाविषयी सर्वस्वच तो आहे हे व्यक्त होते.

: भाकरीची भूक

शेताच मूळ

कुणबी गोकूळ

माझा बैल"

बैल श्रमाची सनद आहे. घराची शोभा,धरणीचा गाभा, गोठ्याचा सोयरा आहे. बैल शिवाराचा श्वास आहे.तो आरबर सम्राट, पेरणीचा थाट आहे. वैभवाची-वृष्टी करणारा आहे समृध्दीचा घोष आहे. मातीचा केवडा आणि प्रपंचाचा सहारा असणारा शेतकऱ्याचा बैल आहे अशी ही ग्रामीण माणसाची कविता आहे. गावाच्या शेतीमातीच्या खिन्न आवाजाला. उजागर करणारी कवी केशव देशमुखांची कविता आहे. कवी केशव देशमुखाची कविता ही ग्रामीण जीवनातील विविध प्रतिमाविश्वाचे वेगळे रूप व्यक्त करते.भाकर ही कविता भाकरीचे व्यापकपण प्रतिमातून कवी व्यक्त करतो.यातून कवीचे भाषिक समृद्धपण व्यक्त होते.

"भाकर बाप

भाकर माय"

भाकर चोरचपाटीची भेदक इच्छा, भाकर भूकेची संहिता, दुष्काळात स्मरणात राहणारी कुलदेवता, भाकर पोटाला सतावणारी अजब किमया,शंकराची तिसरा डोळा, गडचिरोलीच्या भुकेच्या वंचनेत फिरणाऱ्या अंतरंगातील करुणा, सुदाम्याचे पोहे, शबरीचे बोरे भूक-तहान रोजगार हमी कार्ड,

गरीबाचा दृष्टांत, भिकाऱ्याच्या कटो-यातील दिवस, भाकर गाय-वासरूच्या मुखाजवळचा अभंग भाकर झोप उडवणारी, शांत झोप लावणारी, तीर्थरूप जागा, सुखदुःखावरची तृप्त साय, भाकर विश्वाला जोडणारी विश्वव्यापी इ. भाकरीचे व्यायकपण विविध प्रतिमातून मराठी कवितेत पहिल्यादा आलेले असेल हे कवीचे प्रतिभासामार्थ्यातील वेगळेपण म्हणता येते.

थोडक्यात कवी केशव देशमुख यांचा 'पाढा' हा कवितासंग्रह ग्रामीण जीवनातील शेतकऱ्याची व्यथा, वेदना,मातीशी व निसर्गाशी असलेले अतूट संघर्षशील नाते यांचे आशायात्मक चित्रण येते. त्याचबरोबर त्याचबरोबर या जीवनाशी कवीची जुळलेली विचारशील वीण, संघर्षमय जीणेही व्यक्त करते 'पाढा'ही शेतकऱ्याची शेतकऱ्याची सोलून निघालेली दुखरी कहाणी होय.

या कविता संग्रहाची भाषा ग्रामीण बोली, ग्रामीण जीवनातील वेगळे प्रतिमाविश्व् घेऊन साकार होते. मराठी ग्रामीण कवितेत वाट करून देणारी गद्यमय असली तरी तिला शेतीमाती गंधाची एक आंतरिक लय लाभलेली आहे. मराठी ग्रामीण कविता त्यामुळे सामर्थ्यवाण वाट चोखाळेल, मराठी ग्रामीण कवितेत ती सोनपावली होय.

**संदर्भ :**

'पाढा' - केशव सखाराम देशमुख.

काव्य व प्रतिमा - डॉ. सुधीर रसाळ

साठोत्तरी मराठी कविता-रा. ग. जाधव

मराठी ग्रामीण कविता- रामदास सर्जेराव रसाळ